# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.३५३/२०२३/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्रीमती पल्लवी रमेश पाटील, द्वारा - रमेश राजाराम पाटील, रा. ग्राम पंचायत जवळ, ऐनपूर, ता. रावेर, जि. जळगाव - ४२५००७ | माहिती अधिकारी, श्री बाजीराव नाना पाटील टेक्नि. माध्यमिक विद्यालय, बलवाडी, ता. रावेर, जि. जळगाव | मुख्याध्यापक, श्री बाजीराव नाना पाटील टेक्नि. माध्यमिक विद्यालय, बलवाडी, ता. रावेर, जि. जळगाव |

**सुनावणी दिनांक – ११/०७/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १९/०१/२०२३

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अपूर्ण माहिती देवून पूर्ण माहिती देण्यास टाळाटाळ केली.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती करण्यात आलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १०/१०/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२/१०/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१६ ते दि. १०/१०/२०२२

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती**

१) श्री. बाजीराव नाना पाटील टेक्नीकल विद्यालय या आपल्या विद्यालयातील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत २०१६ पासुन खरेदी केलेल्या किराणा मालाची बिलांची साक्षांकित प्रती. (२) आपल्या शाळेतील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत सन २०१६ पासुन खरेदी केलेल्या पौष्टीक आहार बिलांच्या साक्षांकित प्रती. (३) आपल्या शाळेतील शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या स्वयंपाकी यांची मेडिकल प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती. (४) आपल्या शाळेत २०१६ पासुन शालेय पोषण आहाराचे कंत्राट कोणास दिलेले आहे, त्याबाबचे निवेदन, जाहिरात काढल्या बाबतचे साक्षांकित प्रती. (५) सन २०१६ पासुन सदर पोषण आहार चालवण्याबाबत आपल्या शाळेत आलेले अर्ज व निवेदकांच्या साक्षांकित प्रती. (६) सन २०१६ पासुन शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी लागणारे इंधनाची बिलांची साक्षांकित प्रती.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी,श्री बाजीराव नाना पाटील टेक्नि. माध्यमिक विद्यालय, बलवडी, ता. रावेर, जि. जळगाव यांनी दि.०९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांना माहिती शुल्क भरणेबाबत कळविण्यात आल्याचे दिसून येते. अपीलार्थी यांनी शुल्क भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.२५/११/२०२२ च्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १२/१२/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १४/१२/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : अपूर्ण माहिती दिल्याबाबत.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री बाजीराव नाना पाटील टेक्नि. माध्यमिक विद्यालय, बलवडी, ता. रावेर, जि. जळगाव यांनी दि.०६/०१/२०२३ सुनावणी घेवून त्यामध्ये अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर पोस्टाने पुरविण्यात यावी असे आदेशित केल्याचे दिसून येते.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –**
विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी - जन माहिती अधिकारी यांनी दि.२५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांना माहिती पुरविल्याचे दिसून येते. तसेच अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सुमारे ७ वर्षाची विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्याचे निदर्शनास आणून दिले.

६. **निष्कर्ष –**
१) अपीलार्थी यांनी माहिती अर्जात एकापेक्षा अधिक विषयाची मागणी केलेली होती तसेच विशिष्ट दिनांकासहीत कालावधी नमूद नसल्याने माहिती अर्ज मोघम ठरतो.
२) अपीलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १०/१०/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ही माहिती देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(९) व महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ मधील नियम ३(क) नुसार ही माहिती देय होत नाही.
सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०६/०१/२०२३ पारित केलेला प्रथम अपील निर्णय रद्द करण्यात येत आहे.
२) प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक.३५३/२०२३/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. २६३६ दिनांक :- 07 APR 2025